अतितात्काळ / कालमर्यादा

माहीती अधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक (मुख्या.)
कार्यालय पोलीस अधिक्षक, लोहमार्ग, नागपूर
वंजारी नगर पाण्याचे टाकी समोर, अजनी, नागपूर –27
दु.क्र. 0712–2702104, फॅ.क्र. 0712–2702344
ईमेल :– sprailnagpur@gmail.com

क्रमांकः– पोअलोना / मा.अ.कक्ष / लोह / 5760 / 2018 दिनांक :– 14/6/18

संदर्भ :– आपले अर्ज दिनांक 25.05.18 रोजीचा.
(या कार्यालयास दिनांक 25.05.18 ला प्राप्त झाला)

विषय :– **माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत माहिती मिळणेबाबत.**

––00––

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, आपण दिनांक 25.05.18 अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत विषयाचा अर्ज सादर केला असुन सदरचा अर्ज या कार्यालयास दि. 25.05.18 रोजी प्राप्त झाला. आपण सदरच्या अर्जामध्ये मागितलेली माहिती उपलब्ध होण्याकरीता संबंधितांना या कार्यालयाचे दि. 28.05.18 च्या पत्रान्वये आदेशित करण्यात आले होते व त्या पत्राची प्रत माहितीकरीता आपणांस पाठविण्यात आलेली होती. त्यानुसार आपण मागीतले माहिती खालीलप्रमाणे आहे.

**मुद्दा क्रमांक – 1**

लोहमार्ग नागपूर पोलीस जिल्हा या आस्थापनेवर मोटर परिवहन अधिकारी पद मंजूर नाही.

**मुद्दा क्रमांक – 2**

मोटर परिवहन पद मंजूर नसल्याने शासन आदेशाची प्रत उपलब्ध नाही.

**मुद्दा क्रमांक – 3**

या कार्यालयाचा आदेश क्रमांक पोअलोना / पशा–5 / रापोउपनि / सरोदे / मोपवि–कार्यभार / 6105 / 2016 दिनांक 09.06.2016 हा महाराष्ट्र पोलीस नियमावली 1999 भाग–3 मधील नियम क्रमांक 455(1) मध्ये नमुद केल्याप्रमाणे निर्गमीत करण्यात आलेला आहे. सोबत सत्यप्रत जोडलेली आहे.

**मुद्दा क्रमांक – 4**

वरील मुद्दा क्र. 03 मधील नमुद आदेश महाराष्ट्र पोलीस नियमावली 1999 भाग–3 मधील नियम क्रमांक 455(1) नुसार निर्गमीत करण्यात आलेला आहे.

या निर्णयाविरूध्द आपण व्यथित होत असाल तर माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 19(1) मधील तरतुदि नुसार 30 दिवसांच्या आंत प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक, लोहमार्ग, नागपुर यांना अपील अर्ज करु शकता.

सहपत्र – 01 पान

Received
RSF 14/6/18

(एम.जी.इनामदार)
माहीती अधिकारी तथा
पोलीस उप अधिक्षक (मुख्या.)
लोहमार्ग, नागपूर

प्रति,
(रा.दा.सरोदे)
श्री. राजेश दामोधर सरोदे, राखीव पोलीस उपनिरीक्षक,
पोलीस मुख्यालय, चंद्रपुर शहर

API